प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com
३₹
औरंगाबाद

आजच्या अंकासोबत बहार
न्याहारीत पोहे खाणे ठरते लाभदायक

सोयगावच्या बेपत्ता तरुणीचा वर्षानंतर शोध

बंगळुरूमध्ये उपचार केल्यानंतर सेवाभावी संस्थेने केले आई-वडिलांच्या स्वाधीन

वरठाण (ता. सोयगाव, जि. औरंगाबाद), पुढारी वृत्तसेवा : येथील बेपत्ता झालेल्या एका गतिमंद २७ वर्षीय तरुणीचा शोध तब्बल एक वर्षानंतर लागल्याने कुटुंबीयांच्या आनंदाला पारावार राहिला नाही. प्रकृती ठणठणीत झालेली मुलगी घरी आल्यानंतर तिच्या आई-वडिलांच्या डोळ्यांत आनंदाश्रू आले. कर्नाटकची राजधानी बंगळुरू येथील एका सेवाभावी संस्थेने या कामी मोठी भूमिका निभावली.

वरठाण येथील २७ वर्षीय गतिमंद तरुणी एक वर्षापूर्वी गावातील बसस्थानकातून बेपत्ता झाली होती. रात्री उशिरापर्यंत ती घरी परत न आल्याने घरच्या लोकांनी तिचा परिसरासह नातेवाईकांकडे शोध घेणे सुरू केले. घरचे लोक दररोज तिचा शोध घेत होते. मात्र, चार महिने शोध घेऊनही तिचा शोध लागला नाही. गतिमंद असल्यामुळे आपल्या मुलीला साधे मराठी देखील बोलता येत नाही. त्यामुळे तिचा शोध लागणे आता कठीण आहे, असे समजून घरच्या लोकांनी तिचा शोध घेणे बंद केले. दरम्यान, ही तरुणी फिरत-फिरत चार महिन्यांपूर्वी कर्नाटकमधील बंगळुरूच्या रेल्वेस्थानकावर श्रद्धा रिहॅबिलिटेशन फाउंडेशन या सेवाभावी संस्थेच्या सदस्यांना आढळून आली. तिची चौकशी केल्यानंतर ती गतिमंद असल्याचे संस्थेच्या सदस्यांच्या लक्षात आले. त्यानंतर तिला त्यांनी संस्थेच्या कर्जत येथील मनोरुग्ण चिकित्सालयात दाखल केले. या ठिकाणी तिच्यावर काही महिने उपचार करण्यात आले. त्यानंतर तिची मन:स्थिती सुधारली. यामुळे तिला बोलता येऊ लागले. आई-वडिलांसह गावाचे नावही आठवले. दरम्यान, या तरुणीला संस्थेच्या सदस्यांनी एका वाहनातून १४ मार्च रोजी तिच्या वरठाणगावी आणले.

वरठाण : गतिमंद तरुणीला याच वाहनातून आणण्यात आले.

देशभरात फिरणाऱ्या निराधार मनोरुग्णांचा शोध घेत त्यांच्यावर उपचार करून त्यांना त्यांच्या आई-वडिलांच्या स्वाधीन करण्याचे सामाजिक काम गेल्या अनेक वर्षांपासून श्रद्धा रिहॅबिलिटेशन फाउंडेशन ही सेवाभावी संस्था करत आहे. या कामासाठी ही संस्था कुठलेही शुल्क आकारत नाही. वरठाण येथे ज्या वाहनातून तरुणीला आणण्यात आले, त्यात मराठवाड्यातील जालना, परभणी, परतूरसह विदर्भातील अमरावती आणि वाशिम जिल्ह्यांतील बरे झालेले अनेक तरुण-तरुणी होत्या, अशी माहिती गावकऱ्यांनी दिली.